I.O.

पोलीस स्टेशन हिंगोली (श) जि. हिंगोली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** हिंगोली शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0302 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/05/2024 21:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 09/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/05/2024
**Time From (वेळेपासून):** 12:06 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:53 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/05/2024 **Time (वेळ):** 21:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2024 21:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बस स्थानक ,हिंगोली,हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विठ्ठलराव ग्यानबाराव शिंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1970

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हिवरा जाटू,औंढा ,औंढा,हिंगोली ग्रामीण ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हिवरा जाटू,औंढा ,औंढा,हिंगोली ग्रामीण ,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329815085

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उत्तम रतनराव डाखोरे | | | 1. गंगानगर,कारवाडी, हिंगोली , हिंगोली,हिंगोली ग्रामीण ,हिंगोली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक:- 09.05.2024

मी, विठ्ठलराव ग्यानबाराव शिंदे, वय 54 वर्षे, व्यवसाय -शेती, रा. हिवरा जाटू, ता. औढा (नागनाथ), जि. हिंगोली. मो.8329815085

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 08.05.2024 रोजी दुपारी 01.00 वा. चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली येथे येवुन श्री विनायक जाधव, पोलीस निरीक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करतो माझी पत्नी सौ. जिजाबाई विठ्ठलराव शिंदे हिचे नावे हिवरा जाटू शेत शिवारात गट क्र.160 मध्ये 1 एकर 11 आर शेत जमीन आहे.

मी सन 2011 मध्ये सदरची शेत जमीन सौ. देउबाई मधुकर काशिदे रा. हिवराजाटू हिचे कडून नोंदणीकृत खरेदीखता आधारे विकत घेतली आहे व माझे पत्नीचे नावे 7/12 उताऱ्यावर फेरफार मंजुर झालेला आहे. तेव्हापासुन सदरची शेत जमीन माझे ताब्यात आहे. सदरचा फेरफार कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्द केलेला नाही. हया जमीनीच्या खरेदी बाबत देउबाई मधुकर काशिदे हयांनी सन 2018 मध्ये सावकारी कार्यालय औढा येथे आमचे विरूध्द तक्रार केली होती तेथे 2019 मध्ये आमचे बाजूने निकाल लागला होता त्यानंतर तिने परत सन 2021 मध्ये हिंगोली येथील सहकार निबंधक कार्यालयात तक्रार केलेली होती. त्यामध्ये आमचे विरूध्द बाजूने निकाल लागल्यामुळे आम्ही महानिबंधक सावकारी कार्यालय औरंगाबाद व पुणे यांचेकडे अपील केले आहे हया प्रकरणात खरेदीखता बाबत सावकारी कार्यालयाकडे वाद न्यायप्रविष्ट आहे. त्यामध्ये पुढील तारीख 5 जून 2024 आहे, तसेच सदरचे शेती बाबत औंढा येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा सुरु असल्याने सदरचे जमीनीच्या 7/12 उताऱ्यावरील माझे पत्नीचे नाव कायम राहण्यासाठी मी मा. जिल्हाधिकारी हिंगोली, मा.उपविभागीय अधिकारी वसमत, मा. तहसीलदार औढा, मंडळ अधिकारी औंढा, जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था हिंगोली यांना अर्ज केले आहेत.

आमचे गावचे तलाठी श्रीमती सिरसाट मॅडम यांनी माझे पत्नीचे नावे असलेल्या जमीन गट क्र 160 मधील 1 एकर 11 आर. जमीन हि देउबाई मधुकर काशिदे यांचे नाव 7/12 उताऱ्यावर नाव लावण्यासाठी फेरफार घेवून मंजुरीसाठी आमचे गावचे मंडळ अधिकारी उत्तराव डाखुरे यांचेकडे दिला आहे. असे मला समजल्याने मी तलाठी श्रीमती सिरसाट मॅडम यांना भेटुन त्यांना सदर जमीनीचा वाद दिवाणी न्यायालय औंढा ना. येथे व महानिबंधक सावकारी कार्यालय औरंगाबाद व पुणे येथे अपील अर्ज केलेला असुन तुम्ही न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणात 7/12 उताऱ्यावरील नाव बदलु नका असे सांगीतले होते परंतु त्यांनी फेरफार घेवून मंजुरीसाठी मंडळ अधिकारी यांचेकडे पाठविल्याचे मला सांगीतले आहे.

त्यावरून मी खरेदी केलेल्या गट क्र. 160 मधील 1 एकर 11 आर जमीनीची 7/12 उताऱ्याची फेरफार वरील नोंद देउबाई मधुकर काशिदे हिचे नावे न करता माझी पत्नी सौ.जिजाबाई विठ्ठलराव शिदे हिचे नावे कायम ठेवण्यासाठी आमचे तालुक्याचे मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांना दि.07/05/2024 रोजी प्रत्यक्ष भेटलो असता त्यांनी 7/12 उताऱ्यावरील माझे पत्नीचे नाव कायम ठेवुन माझे काम करून देण्यासाठी तुम्हाला खर्च लागेल म्हणून लाचेची मागणी केली आहे.

त्यानंतर मी दिनांक 08.05.2024 रोजी दुपारी 01.00 वा. अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथील कार्यालयात येवुन औंढा तालुक्याचे मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे हे 7/12 उताऱ्यावरील माझे पत्नीचे नाव कामय ठेवुन माझे काम करून देण्यासाठी मागत असलेला खर्च हि लाच असल्याची माझी खात्री झाल्याने त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यानतर पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री राजेश सिताराम कदम,

वर्ग-3, ग्रामीण पाणीपुरवठा उप विभाग हिंगोली, व श्री हबीब इद्रीस अली, बांधकाम उपविभाग जि.प. हिंगोली असे असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती.

त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 09.05.2024 रोजी 12.06 वा. तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 कदम यांचेसह मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांची भेट घेण्या करीता आमचे गावाचे रोडवरील हनुमान मंदिरासमोर गेलो असता मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांची हनुमान मंदिरासमोर भेट झाली तेव्हा माझे त्यांचे सोबत माझे पत्नीचे नांवे असलेल्या शेतीचे 7/12 उताऱ्यावरील पत्नीचे नाव कायम ठेवण्यासंबधी बोलणी झाली त्या दरम्याण मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांनी '' 7/12 तुमच्या नांवान जश्याचं तसं करून देणं माझ काम त्यासाठी मला 20,000/- रू देवुन टाका '' असे म्हणुन पंचा समक्ष लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम हिंगोली येथे घेवुन येण्यास सांगीतले होते.

त्यानंतर दिनांक 09.05.2024 रोजी पो.नि.श्री.विनायक जाधव ला.प्र.वि हिंगोली यांनी हिंगोलीकडे जाणारे डिग्रस पाटीजवळील रोडलगत असणाऱ्या गणपती मंदिराचे पाठीमागे शासकिय वाहनात सापळा पुर्व कार्यवाही दोन पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 20,000/- रू. (ज्यात 500/- रू. दराच्या 40 भारतीय चलनी नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी अँन्थ्राँसीन पावडर व अँल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक पोशि/वाघ, लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणून द्यावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँसीन पावडर लावली व मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांनी लाच स्विकारल्या नंतर माझे डोक्यास बांधलेला पांढरे रंगाचा मोठा रूमाल/शेला काढुन हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांनी मला, पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली होती.

त्यानंतर दिनांक 09.05.2024 चे दुपारी 01.08 वा. दरम्यान मी, पंच व सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी असे मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांना भेटण्यासाठी हिंगोलीकडे रवाना झालो. तेव्हा माझी व मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांची हिंगोली येथील बसस्टॉप जवळील एकता रसवंती समोर भेट झाली तेव्हा लोकसेवक मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांनी मला बसस्टाँपचे पाठीमागील परिसरात नेवुन ''चला आना'' असे म्हणुन लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याने मी माझेकडील लाच म्हणुन आनलेले 20,000/- रू त्यांचे समोर धरले असता त्यांनी ''किती हयंत'' असे म्हणुन ते स्विकारून त्यांचे जवळील मोटर सायकलचे पेट्रोलचे टाकीवरील डिक्कीमध्ये ठेवले तेव्हा मी सापळा पथकास ठरल्या प्रमाणे लाच स्विकाल्याचा ईशारा केला. तेव्हा सापळा पथकाने मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांना दुपारी 01.53 वा.चे सुमारास हिंगोली येथील बसस्टॅडचे पाठीमागील परीसरातील वाहनाचे पार्किग जवळ ताब्यात घेवुन त्यांचे मोटर सायकलचे पेट्रोलचे टाकीवरील काळया रंगाचे कव्हर मध्ये ठेवलेली लाचेची रक्कम 20,000/-रू. त्याचेकडून पंचासमक्ष जप्त केली. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझ व मंडळ अधिकारी डाखुरे यांचेशी प्रत्यक्ष भेटी दरम्यान व फोनवर झालेलें संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरी कार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.

तरी मंडळ अधिकारी उत्तमराव डाखूरे यांनी मला माझे पत्नीचे नांवे असलेल्या शेतीचे 7/12 उताऱ्यावरील पत्नीचे नाव कायम ठेवण्यासंबधी 20,000/- रू लाचेची मागणी करून सदरची रक्कम स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून मी फिर्याद देत आहे.

माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे आज दिनांक 09.05.2024 रोजी पोलीस निरीक्षक श्री विनायक जाधव यांना तोंडी सांगितली ती त्यांनी संगणकावर टंकलिखित केली असून माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचून पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(विनायक जाधव)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

सही
विठ्ठलराव ग्यानबाराव शिंदे,
रा.हिवरा जाटु,ता.औंढा ना.,जि. हिंगोली

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VINAYAK DEVIDASRAO JADHAV
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): 15101000402VDJ
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
विठ्ठल शिंदे

**15. Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): narendra bhimrao p.
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 50686

FIR ची एक प्रत विनामुल्य
मला मिळाली
सही
विठ्ठल शिंदे

पोलीस ठाणे अंमलदार
पो स्टे. निगाली शहर